# जिल्हा परिषद अमरावती

BEST PRACTICE

# Mission 100

An Innovative Scholarship Programme

अमरावती जिल्हयातील जि.प. शाळांमधील
विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता वाढीसाठी नावीन्यपूर्ण उपक्रम...



# उपक्रमाचे उदिष्टे

01 जि.प. शाळांमधील इयत्ता पाचवी आणि आठवीतील विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता वाढ करणे.

02 शिष्यवृत्ती परीक्षेत जिल्हा परिषद शाळांमधील मुलांचा सहभाग वाढविणे.

03 विशेषत: आदीवासी आणि ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांची शिष्यवृत्ती परीक्षेकरीता पूर्वतयारी करणे.

04 शिष्यवृत्ती परीक्षेकरीता आवश्यक संकल्पना विद्यार्थ्यांना स्पष्ट करुन देणे.

05 परीक्षेचा सरावकरुन विद्यार्थ्यांच्या मनातील भीती दूर करणे.

06 आत्मविश्वास वाढवून परीक्षार्थींना सक्षम बनविणे.





# कृती कार्यक्रम

## पूर्वतयारी आणि नियोजन

BEO, केंद्र प्रमुख यांच्या कार्यशाळा घेवून पूर्वतयारी आणि नियोजन करण्यात आले.

## सहभाग

जास्तीत जास्त इयत्ता ५ वी आणि इयत्ता ८ वी मधिल विद्यार्थ्यांची परीक्षेची पूर्व तयारी करुन सहभाग नोंदविण्यात आला.



## तज्ञ शिक्षक मार्गदर्शन

परीक्षेच्या अभ्यासक्रमानुसार प्रत्येक तालुक्यातील ५ तज्ञ शिक्षकांची मार्गदर्शनासाठी निवड करण्यात आली.

# कृती कार्यक्रम

## Whatsapp Groups

विषय निहाय तज्ञ शिक्षकांचे Whatsapp Groups तयार करण्यात आले.


## You Tube channel

शिक्षण विभागाने You Tube channel तयार करुन  परीक्षेच्या मार्गदर्शनाचे व्हीडीओ  अपलोड केलेत.

## अडचणी आणि मार्गदर्शन

सर्व शाळांतील शिक्षकांनी केले सहभागी विद्यार्थ्यांना रोज किमान एक तास परीक्षेतील अडचणी आणि मार्गदर्शन सर्व शाळांतील शिक्षकांनी केले.

# कृती कार्यक्रम



## OMR sheet

चाचणी साठी OMR sheet वापरण्यात आली आहे.




## परीक्षा


पूर्व तयारी परीक्षा फेब्रुवारी २०२५ मध्ये घेण्यात आली



## निधीची तरतूद

सदर उपक्रमासाठी जिल्हानिधी मधून रुपये ६ लक्ष निधीची तरतूद करण्यात आली.





Page 2 of 3

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे

पूर्व उच्च प्राथमिक (इ. 5 वी) व पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षा (इ. 8 वी) दि. 18 फेब्रुवारी, 2024

अंतिम निकालाची जिल्हानिहाय सांख्यिकीय माहिती

| अ. क्र. | जिल्हा | इयत्ता 5 वी परीक्षार्थी संख्या | | | | | | | इयत्ता 8 वी परीक्षार्थी संख्या | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | नोंदविलेले | उपस्थित | अनुपस्थित | पात्र | अपात्र | शिष्यवृत्ती धारक | पात्रतेची टक्केवारी | नोंदविलेले | उपस्थित | अनुपस्थित | पात्र | अपात्र | शिष्यवृत्ती धारक | पात्रतेची टक्केवारी |
| 15 | KOLHAPUR | 25942 | 25722 | 220 | 10020 | 15702 | 591 | **38.96** | 15211 | 14956 | 255 | 3994 | 10962 | 571 | **26.71** |
| 16 | SATARA | 19323 | 19086 | 237 | 6328 | 12758 | 474 | **33.16** | 13856 | 13639 | 217 | 2866 | 10773 | 478 | **21.02** |
| 17 | SANGLI | 19163 | 18859 | 304 | 4989 | 13870 | 436 | **26.46** | 12477 | 12239 | 238 | 2142 | 10097 | 424 | **17.51** |
| 18 | RATNAGIRI | 8172 | 8083 | 89 | 2223 | 5860 | 290 | **27.51** | 5114 | 5038 | 76 | 988 | 4050 | 306 | **19.62** |
| 19 | SINDHUDURG | 3648 | 3606 | 42 | 1041 | 2565 | 154 | **28.87** | 2529 | 2488 | 41 | 475 | 2013 | 163 | **19.10** |
| | **KOLHAPUR REGION TOTAL** | **76248** | **75356** | **892** | **24601** | **50755** | **1945** | **32.65** | **49187** | **48360** | **827** | **10465** | **37895** | **1942** | **21.64** |
| 20 | CHHATRAPATI SAMBHAJINAGAR | 21560 | 20423 | 1137 | 5032 | 15391 | 488 | **24.64** | 18496 | 17642 | 854 | 2335 | 15307 | 466 | **13.24** |
| 21 | JALNA | 8545 | 8249 | 296 | 1967 | 6282 | 276 | **23.85** | 6968 | 6730 | 238 | 845 | 5885 | 269 | **12.56** |
| 22 | BEED | 10496 | 10211 | 285 | 1913 | 8298 | 366 | **18.74** | 8990 | 8739 | 251 | 917 | 7822 | 333 | **10.50** |
| 23 | PARBHANI | 10162 | 9795 | 367 | 1577 | 8218 | 262 | **16.11** | 7919 | 7594 | 325 | 631 | 6963 | 215 | **8.31** |
| 24 | HINGOLI | 5902 | 5742 | 160 | 836 | 4906 | 173 | **14.56** | 3940 | 3826 | 114 | 292 | 3534 | 162 | **7.64** |
| | **CHHATRAPATI SAMBHAJINAGAR REGION TOTAL** | **56665** | **54420** | **2245** | **11325** | **43095** | **1565** | **20.82** | **46313** | **44531** | **1782** | **5020** | **39511** | **1445** | **11.28** |
| 25 | AMRAVATI | 10935 | 10399 | 536 | 1876 | 8523 | 510 | **18.05** | 9733 | 9293 | 440 | 799 | 8494 | 359 | **8.60** |
| 26 | BULDHANA | 11263 | 10851 | 412 | 4231 | 6620 | 427 | **39.00** | 9944 | 9609 | 335 | 2114 | 7495 | 409 | **22.01** |
| 27 | AKOLA | 7680 | 7323 | 357 | 1333 | 5990 | 309 | **18.21** | 5600 | 5344 | 256 | 855 | 4489 | 250 | **16.00** |
| 28 | WASHIM | 4540 | 4371 | 169 | 994 | 3377 | 198 | **22.75** | 3332 | 3214 | 118 | 290 | 2924 | 152 | **9.03** |
| 29 | YAVATMAL | 8519 | 8147 | 372 | 1505 | 6642 | 453 | **18.48** | 7300 | 7001 | 299 | 621 | 6380 | 342 | **8.88** |
| | **AMRAVATI REGION TOTAL** | **42937** | **41091** | **1846** | **9939** | **31152** | **1897** | **24.19** | **35909** | **34461** | **1448** | **4679** | **29782** | **1512** | **13.58** |






Hopefully our scholarship will benefit
many children to help with their education.



अध्ययन समाचार

आता रोज रहा अपडेट!

संपादक : जितेंद्र रोडे

मंगळवार दि. ३१ डिसेंबर २०२४

समग्र शिक्षा पंचायत समिती दर्यापूर तालुकास्तरीय

"मिशन स्कॉलरशिप १००" कार्यशाळा संपन्न

अध्ययन समाचार वृत्तसेवा

दर्यापूर दि.३१ प्रतिनिधी

पंचायत समिती दर्यापूर तालुक्यातील सर्व व्यवस्थापनाच्या शाळेतील इयत्ता पाचवी ला शिकवणारे शिक्षकांसाठी प्रबोधन विद्यालय दर्यापूर येथे तालुकास्तरीय "मिशन स्कॉलरशिप १००" कार्यशाळा ३० डिसेंबर ला संपन्न झाली.

संतोषजी घुगे गटशिक्षणाधिकारी पंचायत समिती दर्यापूर यांनी सर्व शिक्षकांना तालुक्यातील शिष्यवृत्ती परीक्षेतील यशाचा असलेला आलेख माध्यमातून उंचावणे व गुणवंत विद्यार्थी तयार करून देशाची भावी पिढी बलवान करावे असे आवाहन केले. तालुक्यातून यावेळी शंभरपेक्षा जास्त विद्यार्थी शिष्यवृत्तीधारक होण्यासाठी सर्वांनी विशेष प्रयत्न करावे याबाबत मार्गदर्शन केले.

नंदकुमार जाधव शिक्षण विस्तार अधिकारी पंचायत समिती दर्यापूर यांनी गणित आणि बुद्धिमत्ता मधील काही घटकांवर सोप्या सोप्या पद्धतीने कमी वेळेमध्ये उत्तर कसे येईल याबाबत ट्रिक्स सांगितल्या.या कार्यशाळेचा उपयोग जास्तीत जास्त करून आपण मुलांची गुणवत्ता कशी वाढवू शकतो याविषयी मार्गदर्शन केले. इतरही परीक्षेला जास्तीत जास्त विद्यार्थ्यांना संधी उपलब्ध करून विद्यार्थ्यांची स्पर्धा परीक्षेची तयारी करून घ्यावी असे आवाहन केले.

रेवस्कर प्राचार्य प्रबोधन विद्यालय दर्यापूर ,सुनिल स्वर्गीय गटसमन्वयक ,सतीश नांदणे केंद्रप्रमुख विलोरी हे उपस्थित होते. शिष्यवृत्ती परीक्षा पेपर एक मराठी व गणित आणि पेपर दोन मधील इंग्रजी व बुद्धिमत्ता या विषयाची अचूक व प्रभावी अध्यापन करण्यासाठी आवश्यक असणाऱ्या बाबींची शिष्यवृत्ती मार्गदर्शन विषय व घटकनिहाय नियोजन नुसार सुलभक कु. प्रतिभा कुन्हाडे, विना राऊत, प्रवीण उकसार, मो.इरशाद आफाक, कु.लोणकर, कु.पारडे, कु.वैशाली पाविकार, अविनाश घोरडे, चव्हाण, शहजाद यांनी तज्ञ मार्गदर्शक म्हणून काम पाहिले. प्रतीक आठवड्याचे शिक्षकांना विषय,घटक निहाय नियोजन ,आणि त्यावर आधारित चाचणी घेणे असे नियोजन कार्यशाळेमध्ये सांगण्यात आले. तालुकास्तरीय कार्यशाळा मध्ये एकूण ६९ शाळेतील शिक्षक उपस्थित होते. समग्र शिक्षा पंचायत समिती दर्यापूर सर्व विषय साधन व्यक्ति, विशेषतज्ञ, विशेष शिक्षक यांनी कार्यशाळेला

केंद्रस्तरावर तज्ञ मार्गदर्शक शिक्षकांच्या उपस्थितीत कार्यशाळा आयोजित करण्यात आल्यात. त्यामध्ये विज्ञान, गणित आणि इंग्रजी भाषा विषयांच्या सराव कशा पध्दतीने करुन घेता येईल याबाबत मागदर्शन करण्यात आले.

केंद्र प्रमुख, विस्तार अधिकारी, BEO, EO, CEO यांचेकडून नियमितपणे शाळां भेटी आणि पूर्व परीक्षा तयारीची पाहणी करण्यात आली .







शिक्षण विभागातील अधिकारी यांचेकडून शाळां भेटी आणि पूर्व परीक्षा तयारीची पाहणी करण्यात आली .















पुण्य नगरी

# ३ हजार ८१७ विद्यार्थी शिष्यवृत्तीकरिता पात्र

**पुण्य नगरी** / प्रतिनिधी

**अमरावती :** जिल्ह्यात महालिका क्षेत्रासह १४ तालुक्यांत राबविण्यात आलेल्या शिष्यवृत्ती परिक्षेत इयता पाचवी व आठवीचे ३ हजार ८१७ विद्यार्थी पात्र झाले आहेत. यामध्ये पाचवीचे २७०५ तर आठवीचे १११२ विद्यार्थ्यांचा समावेश आहे. मात्र २१ हजार ६३ विद्यार्थी शिष्यवृत्तीकरिता अपात्र झाले आहेत. महाराष्ट्र राज्य शिक्षा परिषद पुणे च्या वतीने शनिवारी निकाल जाहिर करण्यात आला.

जिल्ह्यात पाचवी व आठवीच्या विद्यार्थ्यांकरिता शिष्यवृत्तीची परिक्षा ९ फेब्रुवारी रोजी शिक्षण विभागाकडून घेण्यात आली होती. या परिक्षेत पाचवी मधुन १४ हजार ८४४ विद्यार्थ्यांनी नोंद केली होती. परिक्षेला मात्र १४ हजार २६२ विद्यार्थी हजर होते तर ५०८ विद्यार्थी गैरहजर होते. आठवीकरिता १० हजार ७४१ विद्यार्थ्यांनी परिक्षेकरिता नोंद केली असता १० हजार ६१८ विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्तीची परिक्षा दिली. यामध्ये ६४१ विद्यार्थी गैरहजर होते. अशा आठवी व पाचवी मधुन २५ हजार ७४१ विद्यार्थ्यांनी परिक्षेकरिता नोंदणी केली असता प्रत्येक्षात २४ हजार ८८० विद्यार्थ्यी शिष्यवृत्तीची परिक्षा फेब्रुवारीमध्ये दिली होती. याचा निकाल लागला असून याची टक्केवारी २५ ते ३० टक्केच्या आतच आहे. पाचवीमध्ये शिष्यवृत्तीकरिता २७०५ तर आठवीमध्ये १११२ असे एकूण ३८१७ विद्यार्थी पात्र झाले आहेत. तर पाचवीमधील ११,५५७ व आठवीमधील ९,५०६ असे २१ हजार ६३ विद्यार्थी अपात्र झाले आहेत. पात्र विद्यार्थ्यांमध्ये पाचवीची टक्केवारी १८.९७ असून आठवीची टक्केवारी १०.४८ टक्के इतकी आहे.

Amravati Edition
Apr 27, 2025 Page No. 04
Powered by: erelego.com

जिल्हा परिषद अमरावती

## MISSION SCHOLARSHIP 100

जिल्हा परिषद अमरावती

### 2024-25

### Z P AMRAVATI

### CLASS 5TH / 8TH MAHARASHTRA STATE SCHOLARSHIP

### EXAM RESULTS


| YEAR | CLASS | TOTAL STUDENTS | STUDENTS ELIGIBLE | PERCENTAGE |
|---|---|---|---|---|
| 2023-24 | 5TH | 10935 | 1876 | 18.04 |
| | 8TH | 9733 | 799 | 8.6 |
| 2024-25 | 5TH | 14842 | 2705 | 18.97 |
| | 8TH | 11079 | 1112 | 10.48 |



# फलश्रृती

फेबुवारी २०२५ मध्ये घेण्यात आलेल्या परीक्षेत मागील वर्षापेक्षा 1142 विद्यार्थीची वाढ झालेली आहे. सदरचे मिशन यापुढेही अधिक उदष्टि ठेवून सुरु राहील.







Hopefully our scholarship will benefit
many children to help with their education.



# धन्यवाद